मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# प्रशासकच मांडणार महापालिकेचा तिसरा अर्थसंकल्प

## विविध विभागप्रमुखांची बैठक, चालू कामे, नियोजित कामासाठी निधीचा आढावा

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेचा अर्थसंकल्प हा पुढील वर्षभरात होणाऱ्या शहराच्या विकासाचा आरसा असतो. साधारणपणे अर्थसंकल्प तयार करण्याचे काम मागच्या तीन महिन्यांपासून सुरू आहे. त्यामध्ये दहा लाखापर्यंतची कामे सामान्य नागरिकांनी सुचवली असून त्या कामांची पडताळणी होऊन आवश्यक असलेल्या कामांचा समावेश अर्थसंकल्पात केला जाणार आहे. त्यामुळे महापालिकेचा सलग तिसरा अर्थसंकल्प प्रशासक मांडणार आहेत.



पिंपरी-चिंचवडमध्ये मोठ्या प्रमाणावर विकासकामे सुरु आहेत. शहरात प्रशस्त रस्ते, मोठी उड्डाणपुले, पाणी,आरोग्य,पथदिवे, रुग्णालये, शाळा अशी विविध कामे मोठ्या प्रमाणात झालेली आहेत. स्मार्ट सिटी असलेल्या पिंपरी-चिंचवडमध्ये महापालिकेच्या माध्यमातून विकासकामे प्रचंड होत आहेत. मात्र, विविध कारणांनी निवडणुका लांबल्याने लोकप्रतिनिधींऐवजी प्रशासकांच्या हाती तीन वर्षांपासून कारभार आहे. त्यामुळे शहराच्या प्रगतीची गती असणारा महापालिकेचा सलग तिसरा अर्थसंकल्प प्रशासक मांडणार आहेत. प्रशासक हेच स्थायी समिती अध्यक्ष व सर्वसाधारण सभेचे पीठासन अधिकारी म्हणून अर्थसंकल्प मंजूरही करणार आहेत. महापालिकेमध्ये २०१७ मध्ये निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींची मुदत १३ मार्च २०२२ रोजी संपली आहे. कोरोना काळातील प्रतिबंध, ओबीसी आरक्षणाचा तिढा, बदललेली राजकीय परिस्थिती अशा विविध कारणांनी वेळेत निवडणूक होऊ शकली नाही. परिणामी, १४ मार्च २०२२ पासून राज्य सरकारने आयुक्तांचीच प्रशासक म्हणून नियुक्ती केली आहे.

महापालिकेच्या लेखा व वित्त विभागाकडून अर्थसंकल्प निर्मितीची प्रक्रिया सुरू होते. त्यासाठी विविध विभाग व क्षेत्रीय कार्यालयांकडून माहिती मागवली जाते. सर्व माहिती संकलित झाल्यानंतर स्थायी समितीला अर्थसंकल्प सादर केला जातो. स्थायी समितीमध्ये त्यावर चर्चा होते. स्थायीचे सदस्य काही हरकती व सूचना करतात. त्यांचा समावेश करून अंतिम अर्थसंकल्प सर्वसाधारण सभेत मांडला जातो. सभेची मंजुरी मिळाल्यानंतर एक एप्रिलपासून अर्थसंकल्पाची अंमलबजावणी केली जाते. शिवाय, आठही प्रभाग स्तरावरील कामांचा समावेशही त्यामध्ये असतो. त्यासाठी स्वतंत्र तरतूद असते. सध्या २०२५-२६ चा अर्थसंकल्प तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. फेब्रुवारीत अर्थसंकल्प स्थायी समिती समोर सादर केला जाण्याची शक्यता आहे. मात्र, त्यामध्ये कोणते नवीन प्रकल्प असतील, सध्या सुरू असलेल्या प्रकल्पांसाठी किती तरतूद असेल, हे येणाऱ्या अर्थसंकल्पात कळणार आहे.

### आर्थिक नाड्या प्रशासकांच्या हाती

» लोकनियुक्त प्रतिनिधींची मुदत संपण्यापूर्वी अर्थात फेब्रुवारी २०२२ मध्ये तत्कालीन स्थायी समिती कारभाऱ्यांनी आयुक्तांकडून २०२२-२३ चा अर्थसंकल्प स्वीकारला होता. मात्र, त्याची अंमलबजावणी प्रशासक म्हणून आयुक्तांनीच केली होती. २०२३-२४ चा अर्थसंकल्प प्रशासक शेखर सिंह यांनीच मांडला व स्वीकारला होता. आता सलग तिसरा अर्थात २०२४-२५ चा अर्थसंकल्प आयुक्त शेखर सिंह मांडणार आहेत. स्थायी समिती अध्यक्षपद आणि सर्वसाधारण सभा पीठासन अधिकारीपदही त्यांच्याकडेच आहे. त्यामुळे २०२५-२६चा अर्थसंकल्पही प्रशासकच स्वीकारतील.

# आपत्तीचे संकट रोखण्यासाठी जपानी तंत्रज्ञान

## शहराची आपत्ती व्यवस्थापन कार्यक्षमता अधिक सक्षम करण्यासाठी याचा उपयोग होणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

औद्योगिक नगरीचा दिवसेंदिवस विस्तार होत आहे. शहरात उद्भवणाऱ्या आपत्तींवर नियंत्रण मिळविणे हे मोठे आव्हान आहे. शहराची झपाट्याने होणारी वाढ आणि औद्योगिक आस्थापनांची संख्या पाहता जपानमधील आपत्ती व्यवस्थापन पद्धतींमध्ये वापरण्यात येणाऱ्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे विचाराधीन आहे. त्यामुळे शहराची आपत्ती व्यवस्थापन कार्यक्षमता अधिक सक्षम करण्यासाठी याचा उपयोग होणार आहे.

महापालिका हद्दीत उद्भवणाऱ्या नैसर्गिक आणि मानवनिर्मित आपत्तींवर जलद तसेच प्रभावीपणे नियंत्रण कसे मिळवावे, याबाबत जपानमधील आंतरराष्ट्रीय संबंधांसाठी कार्य करणाऱ्या स्थानिक प्राधिकरण परिषदेच्या सिंगापूर प्रतिनिधी कार्यालयाच्या वतीने महापालिकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी आयोजित पाच दिवसीय अग्निशमन व आपत्ती



प्रतिबंधक प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. त्याचे उद्घाटन मंगळवारी करण्यात आले. त्यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे यांनी ही माहिती दिली. औंध कॅम्पच्या ३३० इन्फट्री ब्रिगेडचे कर्नल नितीन रुमाले, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाचे संतोष सिंह, सिंगापूर येथील जे क्लेर संस्थेचे कार्यकारी संचालक ताकानो, वरिष्ठ उपसंचालक नागता, उपसंचालक सुश्री कोबायाशी, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर, उपआयुक्त मनोज लोणकर, राजेश आगळे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल यावेळी उपस्थित होते.

'जपानी तंत्रज्ञानाची आणि आपत्ती व्यवस्थापन हाताळणीची माहिती प्रशिक्षणाच्या माध्यमातून होत आहे. जपानमधील आपत्ती व्यवस्थापन प्रणाली हे समन्वयाचे एक उत्तम उदाहरण आहे. पिंपरी-चिंचवड शहरात उद्भवणाऱ्या आपत्तीला सामोरे जात असताना आपत्ती व्यवस्थापन हे फक्त अग्निशमन विभागाकडील कार्य नसून, हे सर्व यंत्रणांनी समन्वयाने परिस्थिती हाताळण्याचे व्यवस्थापन आहे. आपत्ती व्यवस्थापनामध्ये प्रत्येक यंत्रणेची एक महत्त्वपूर्ण जबाबदारी असते.' असे जांभळे यांनी स्पष्ट केले.

# बारामतीत पशुवैद्यकीय महाविद्यालय उभारणार

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते 'कृषिक 2025' कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन

**पुणे | प्रतिनिधी**

बारामतीच्या नावाला साजेसे, परिसराच्या वैभवात भर घालणारे अत्याधुनिक दर्जाचे पशुवैद्यकीय महाविद्यालय येथे उभारण्यात येईल; अशी घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली. बारामती ॲग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्ट व कृषी विज्ञान केंद्राला राज्यशासनाच्यावतीने सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल, अशीही ग्वाही त्यांनी दिली.

कृषी विज्ञान केंद्र माळेगाव खु. येथे आयोजित 'कृषिक २०२५' या आंतरराष्ट्रीय कृषी प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी कृषीमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे, पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, बारामती ॲग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्टचे अध्यक्ष तथा

ज्येष्ठ खासदार शरद पवार, खासदार सुनेत्रा पवार, खासदार सुप्रिया सुळे, ऑक्सफर्ड विद्यापीठाचे




संचालक डॉ. अजित जावकर, आयआयटी खरगपूरचे शास्त्रज्ञ डॉ. पियुश सोनी, ॲग्री पायलटचे प्रकल्प संचालक प्रशांत मिश्रा, बारामती ॲग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्टचे चेयरमन राजेंद्र पवार, विश्वस्त प्रतापराव पवार, मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश नलावडे आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, दरवर्षी आयोजित 'कृषिक' प्रदर्शनात बदलत्या काळानुसार तंत्रज्ञानाचा वापर करुन बी-बियाणे, पिके, फुले व फळांच्या जाती, भाजीपाल्यामध्ये संशोधन करुन अधिकची भर पडत आहे. यावर्षीच्या प्रदर्शनात कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर हे एक नवीन आकर्षण आहे. या प्रदर्शनाला लाखो शेतकरी भेट देवून नवनवीन गोष्टी आत्मसात करतात, आपल्या शेतात त्याचा वापर करतात. त्यामुळे खऱ्याअर्थाने या प्रदर्शनाला एक वेगळ्या प्रकारची उंची प्राप्त झालेली आहे.

जागतिक पातळीवर कृषी क्षेत्रात संशोधन आणि तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यात येतो, आता शेतकऱ्यासमोर दुष्काळ, पर्जन्यमानाची अनियमितता, घटते जमिनीचे क्षेत्र अशी विविध प्रकारची आव्हाने उभी असून त्यावर मात करण्याकरीता प्रयत्न करावेत. राज्यात कृषी विषयात विविध संशोधन होत असून यामधून नव्याने उदयास आलेली बी-बियाणे, पिके, फुले व फळांच्या जातींची मोठ्या प्रमाणावर जनजागृती करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

उत्पादनात वाढ होण्याच्यादृष्टीने शेतकऱ्यांनी ऊसक्षेत्रात नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करावा, उसाच्या नवनवीन वाणाची लागवड करावी. शेतमालाची उत्पादकता वाढविण्याकरीता राज्य व केंद्रशासनाच्यावतीने सहकार्य करण्यात येईल. कृषी विभागाच्या जिल्ह्यातील अधिकारी व कर्मचारी, साखर कारखान्यातील शेतकी अधिकारी, पदाधिकारी, नागरिकांनी या प्रदर्शनास भेट देऊन लाभ घ्यावा, असेही आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले.

### शेतकऱ्यांना विविध योजनांचा पारदर्शकपद्धतीने लाभ देण्याकरीता तंत्रज्ञानाचा वापर करणार : कृषीमंत्री

» **कृषीमंत्री ॲड. कोकाटे म्हणाले, शेती विषयात होणारे संशोधन, तंत्रज्ञान, नवीन प्रयोगाचा, तसेच विविध लोककल्याणकारी योजनांचा लाभ शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पारदर्शक पद्धतीने पोहचविणारी यंत्रणा अधिक सक्षम करण्यात येईल. त्यासाठी तंत्रज्ञानाचा प्रभावीपणे वापर करण्यात येईल. यादृष्टीने शेतकऱ्यांचा सर्वांगीण विचार करुन ॲग्रीस्टॉक संकेतस्थळ विकसित करण्यात येत आहे.**

# विद्यार्थ्यांनी अनुभवले छत्रपती संभाजी महाराजांचे शौर्य

## प्रियदर्शनी ग्रुप ऑफ स्कूलचा उपक्रम : अभिनेते अनुप सिंह यांच्या अचानक एंट्रीने आनंद व्दिगुणित

**पिंपरी | प्रतिनिधी**

जय भवानी, जय शिवाजी....,हर हर महादेव...., छत्रपती शिवाजी महाराज की जय...., छत्रपती संभाजी महाराज की जय.... अशा घोषणा देत शूरवीर, महापराक्रमी, धर्मरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या शौर्य आणि पराक्रमाची अनुभूती देणारा 'धर्मरक्षक महावीर छत्रपती संभाजी महाराज' हा चित्रपट पाहून 'प्रियदर्शनी ग्रुप ऑफ स्कूल'चे विद्यार्थी, पालक भारावून गेले. तसेच चित्रपटात छत्रपती संभाजी महाराज यांची भूमिका साकारणारे अभिनेते ठाकूर अनुप सिंह यांची चित्रपटगृहात अचानक एंट्री झाल्याने विद्यार्थ्यांचा आनंद व्दिगुणित झाला.

परदेशातील कल्पनेमधील सुपर हिरोच्या चित्रपटांना गर्दी होते. मात्र,स्वराज्यासाठी बलिदान देणाऱ्या महापुरुषांच्या जीवन



चरित्रावर आधारित चित्रपटांकडे प्रेक्षक पाठ फिरवतात. परंतु, प्रियदर्शनी ग्रुप ऑफ स्कूलचे व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. जितेंद्र सिंह, डॉ. राजेंद्र सिंह यांनी छत्रपती संभाजी महाराज यांच्या शौर्य आणि पराक्रमाची गाथा विद्यार्थ्यांना माहीत व्हावी, या उद्देशाने 'धर्मरक्षक महावीर छत्रपती संभाजी महाराज' हा चित्रपट विद्यार्थ्यांना दाखविण्यासाठी पुढाकार घेतला. पुणे आणि पिंपरी चिंचवड परिसरातील प्रियदर्शनी शाळेतील विद्यार्थी व पालकांनी चित्रपट पाहण्यासाठी मोठ्या संख्येने गर्दी केली. यावेळी विद्यार्थी व पालकांसाठी अभिनेता अनुप सिंग यांची अचानक झालेली भेट ही एक पर्वणी ठरली. ठाकूर अनुप सिंह यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांच्याबरोबर चित्रपटही पाहिला. यावेळी चित्रपटांचे निर्माते धर्मेंद्र बोरा, कार्यकारी निर्माते राहुल नेवसे, दिग्दर्शक तुषार शेलार, प्रियदर्शनी ग्रुप ऑफ स्कूलच्या व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. निशा सिंह आदी उपस्थित होते.

डॉ.जितेंद्र सिंह म्हणाले, एनईपी मध्ये इंडियन नॉलेज सिस्टीमला (आकेएस)महत्त्व देण्यात आले आहे.आयकेएस अंतर्गत विद्यार्थ्यांना आपल्या इतिहासाची व संस्कृतीची माहिती माहिती करून देणे आवश्यक आहे.त्याचाच एक भाग म्हणून छत्रपती संभाजी महाराज यांच्या शौर्याची व पराक्रमाची गाथा विद्यार्थ्यांना चित्रपटाच्या माध्यमातून पोहोचविण्याचा आमचा प्रयत्न होता. प्रियदर्शनी ग्रुप ऑफ स्कूलच्या सर्व शाखांच्या मुख्याध्यापिका व शिक्षकांनी कार्यक्रमाचे यशस्वी संयोजन केले.

> "मराठी प्रेक्षक दक्षिणेकडील पुष्पा चित्रपट पाहतात. परंतु,आपले राजे छत्रपती संभाजी महाराज यांच्यावरील चित्रपट पहाण्यासाठी गर्दी होत नाही,याचे मला वाईट वाटले. छत्रपती संभाजी महाराज यांना मानाचा मुजरा म्हणून थोडे काही करता यावे,यासाठी प्रियदर्शनी ग्रुप ऑफ स्कूलने पुढाकार घेऊन विद्यार्थ्यांना व पालकांना 'धर्मरक्षक महावीर छत्रपती संभाजी महाराज' हा चित्रपट दाखवला.
>
> **– डॉ. जितेंद्र सिंह, व्यवस्थापकीय विश्वस्त, प्रियदर्शनी ग्रुप ऑफ स्कूल.**

# भटक्या श्वानांमुळे जीव धोक्यात..!

## निगडी प्राधिकरण, आकुर्डीसह पिंपरी-चिंचवड शहराच्या विविध भागांमध्ये भटक्या श्वानांचा वावर मोठ्या प्रमाणात वाढला आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

निगडी प्राधिकरण, आकुर्डीसह पिंपरी-चिंचवड शहराच्या विविध भागांमध्ये भटक्या श्वानांचा वावर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. या श्वानांमुळे नागरिकांमध्ये दहशत निर्माण झाली आहे. लहान मुलांपासून ज्येठ नागरिकांवर ते हल्ले करत असून यामुळे त्यांचा जीव धोक्यात आला आहे.

निगडी प्राधिकरण, आकुर्डी, मोहननगर, काळभोरनगर, चिंचवड स्टेशन, रामनगर, महात्मा फुलेनगर, दत्तनगर, शंकरनगर, विद्यानगर, परशुराम, आनंदनगर, इंदिरानगर आदी परिसरात मोकाट श्वानांचा वावर वाढल्याच्या अनेक तक्रारी नागरिकांकडून महापालिकेला येत आहेत. या भागांमध्ये भटक्या श्वानांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे परिसरातील लहान मुले तसेच ज्येष्ठ नागरिकांना याचा मोठ्या प्रमाणात त्रास होत आहे. अनेक गल्ल्यांमध्ये, चौकांमध्ये तसेच मुख्य रस्ते, भाजीपाला मार्केट, चिकन, मटणची दुकाने या ठिकाणी मोठ्या प्रमाणात भटक्या श्वानांचा वावर वाढला आहे.



### निर्बीजीकरणावर लाखोंचा खर्च

» महापालिकेच्या वतीने वर्षानुवर्षे पशुवैद्यकीय विभागामार्फत निविदा काढून मोकाट श्वान पकडून त्यांचे निर्बीजीकरण करण्यात येते. या कामाचा स्वतंत्र ठेकेदार नियुक्त केला जातो. या कामासाठी लाखो रुपये खर्च करून श्वानांची संख्या नियंत्रणात येत नाही. मात्र, त्यांची संख्या नियंत्रणात येण्याऐवजी ती वाढताना दिसत आहे. मागील काळात श्वानांची बोगस संख्या दाखवून खोटी बिले काढल्याचा आरोप ठेकेदार कंपनीवर झाला आहे. शहरातील भटक्या श्वानांचा तत्काळ बंदोबस्त करा, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

अनेकदा रात्रीच्या सुमारास ही कुत्री कळपाने अंगावर येतात. गाडीच्या पाठीमागे धावतात. भटक्या श्वाानांकडून चावा घेणे, हल्ला करणे अशा घटनादेखील सातत्याने घडत आहेत. त्यामुळे अशा श्वानांना पकडून महापालिका प्रशासनाने बंदिस्त करावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

पिसाळलेल्या श्वानांच्या संख्येतही वाढ होत आहे. परिसरातील लहान बालके रस्त्यावर खेळत असताना अनेक वेळा हे श्वान त्यांच्यावर धावून जात आहेत. मोकाट श्वानांच्या भीतीने विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक, कामगार यांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे. या परिसरात मोकाट श्वान रात्रीच्या वेळेत खूप जोरजोरात भुंकतात. त्यामुळे रात्रीच्या वेळेत नागरिकांचा निद्रानाश होतो. लहान मुले घाबरून जागी होतात. हे मोकाट श्वान लहान मुले, महिलांच्या अंगावर धावून जातात. त्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

तसेच कामानिमित्त रात्रपाळीसाठी ये-जा करणाऱ्या कामगारांच्या वाहनांच्या मागे ही कुत्री धावतात. प्रसंगी चावा घेण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे हे कामगार आपली वाहने जोरात पळवण्याचा प्रयत्न करतात. यामुळे अनेक लहान-मोठे अपघात झाले आहेत. यामुळे एखादा मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

> "कायद्याने श्वानकडून त्याला मारून टाकणे गुन्हा आहे. त्यामुळे भटके श्वान पकडून त्यांच्यावर निर्बीजीकरणाची शस्त्रक्रिया केली जाते. एका श्वानावर निर्बीजीकरण शस्त्रक्रिया केल्यानंतर चार दिवस देखरेखीखाली ठेवण्यात येते. त्यांच्या मूळ अधिवासात सोडले जाते."
>
> - संदीप खोत, उपायुक्त, पशुवैद्यकीय विभाग, पिंपरी-चिंचवड महापालिका

> "शहरात मोकाट श्वानांनी उच्छाद मांडला असून महापालिकेने यांना वेळीच बंदिस्त करणे गरजेचे आहे, भटक्या श्वानांनी चावा घेतल्यामुळे रेबीजसारख्या आजारांची लागण होऊ शकते. अनेक वेळा ते अंगावर येत असल्यामुळे लहान बालकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. जर एखादा मोठा अपघात होऊन एखाद्या नागरिकाला प्राणास मुकावे लागले तर याची सर्वस्वी जबाबदारी महापालिकेची असेल."
>
> - मारुती भापकर, सामाजिक कार्यकर्ते

# एमआयडीसीतील समस्यांवर कायमस्वरूपी तोडगा काढू

## औद्योगिक समस्यांबाबत लघुउद्योग संघटनेच्या पाठपुराव्यानंतर मुख्यमंत्री फडणवीसांनी दिली ग्वाही

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड लघुउद्योग संघटनेने शहरातील उद्योगजगताला सामोरे जावे लागणाऱ्या विविध समस्यांचे गाऱ्हाणे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मांडले. याबाबत कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी लवकरच एक बैठक घेण्यात येईल, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहे.

लघुउद्योग संघटनेच्या शिष्टमंडळाने पुणे येथे मुख्यमंत्र्यांची नुकतीच भेट घेतली. त्या प्रसंगी पिंपरी-चिंचवड लघुउद्योग संघटनेचे अध्यक्ष संदीप बेलसरे, उपाध्यक्ष विनोद नाणेकर, सचिव जयंत कड, संचालक संजय सातव, अतुल इनामदार, स्वीकृत संचालक रामदास जैद आदी उपस्थित होते. पिंपरी-चिंचवड महापालिका, पीएमआरडीए, एमआयडीसी, पोलीस विभाग, महावितरण, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आदी आस्थापनांचे संबंधित अधिकारी तसेच पिंपरी-चिंचवड लघुउद्योग संघटना यांची एक संयुक्त बैठक घेतली जाईल. त्या माध्यमातून उद्योजकांच्या समस्या कायमस्वरूपी सोडवण्यासाठी लवकरात लवकर कामे चालू केली जातील, असे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी शिष्टमंडळाला दिले.



औद्योगिक पट्ट्यात जाणवणाऱ्या विविध समस्यांचे निवेदन मुख्यमंत्र्यांना देण्यात आले. त्यामध्ये विविध मागण्या मांडण्यात आल्या. उद्योजकांना एलबीटीची बाकी नसलेली रक्कम व्याज व शास्ती दंडासह भरण्याच्या नोटीस पाठवलेल्या आहेत. त्यामुळे अगोदरच मेटाकुटीला आलेला उद्योजक हा आता पूर्णपणे नेस्तनाबूत होतो की काय, अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. निवासी भागातील लघुउद्योगांचे औद्योगिक परिसरात पुनर्वसन करण्यासाठी पालिकेने एमआयडीसीकडून १९९२ मध्ये टी-२०१ हा भूखंड घेतला होता. त्यावर प्रकल्पाचे कामदेखील सुरू केले. २५ वर्षांनंतर हा प्रकल्प बऱ्यापैकी पूर्ण झाला आहे. या प्रकल्पातील गाळ्यांचा महापालिकेने ठरवलेला दर उद्योजकांना परवडणारा नाही. हा दर कमी करून गाळे वाटपाची प्रक्रिया लवकर सुरू करावी. महानगरपालिकेने ३१ डिसेंबर २०२० पर्यंत आरक्षित भूखंड, पूररेषा या जागेवर बांधकामे वगळून उर्वरित सर्व अवैध बांधकामे ही सरसकट नियमित करावीत. एमआयडीसी पेठ क्रमांक ७ आणि १०, कुदळवाडी, चिखली, तळवडे येथील अंतर्गत रस्ते अत्यंत खराब झालेले आहेत. अनेक ठिकाणी फक्त खडी टाकली आहे. या रस्त्यांचे तातडीने डांबरीकरण करण्यात यावे. तसेच शहरातील औद्योगिक पट्ट्यातून चाकण औद्योगिक परिसरात जातांना रस्ते अरुंद व खराब असल्यामुळे सतत वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. त्यावर कायमस्वरूपी तोडगा काढावा. पेठ क्रमांक ७ आणि १० या औद्योगिक परिसरात महापालिकेकडून केला जाणारा पिण्याच्या पाण्याचा पुरवठा अपुरा आहे. त्यामुळे कंपन्यांना बाहेरून पाणी विकत घ्यावे लागते. या परिसरात दिवसातून किमान दोन वेळा सकाळी व सायंकाळी पूर्ण दाबाने पाणीपुरवठा करावा. अशा समस्या उद्योजकांनी मांडल्या.

### उद्योजकांनी मांडल्या विविध समस्या

» उद्योजकांना व्यापारी दराने आकारले जाणारे पाण्याचे बिल औद्योगिक दराने आकारावे. तसेच पाणीपट्टी दर कमी करावा. ज्या औद्योगिक परिसरात कचरा उचलण्यासाठी वाहने जात नाहीत. त्या ठिकाणी महापालिकेने कचरा उचलण्यासाठी वाहने उपलब्ध करून द्यावी. औद्योगिक घातक कचरा गोळा केल्यानंतर त्याची विल्हेवाट लावण्याची सोय आणि जबाबदारीदेखील महानगरपालिकेने उचलावी, अशा विविध समस्या उद्योजकांनी मांडल्या.

# गलवानच्या घटनेची पुनरावृत्ती होऊ नये

## लष्करदिनानिमित्त पुण्यात आयोजित संचलनानंतर जनरल द्विवेदी यांनी माध्यमांशी संवाद साधला, यावेळी ते बोलत होते.

**पुणे | प्रतिनिधी**

गलवानच्या घटनेची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी आपल्याला दक्ष राहावे लागेल. यासाठी राजनैतिक, लष्कर आणि गृह मंत्रालय अशा सर्वच स्तरांवर एकत्रित प्रयत्नांची गरज आहे, तरच अशा धक्कादायक घटना पुन्हा घडणार नाहीत, असे मत लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी व्यक्त केले.

लष्करदिनानिमित्त पुण्यात आयोजित संचलनानंतर जनरल द्विवेदी यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी ते बोलत होते.

लष्कराचा दक्षिण विभाग अतिशय महत्त्वाचा असून त्याचे मुख्यालय पुण्यात आहे. देशातील ११ राज्ये आणि तीन केंद्रशासित प्रदेश असा एकूण ४१ टक्के भूभाग दक्षिण मुख्यालयाच्या अखत्यारित येतो. नौदलाची तीन मुख्यालये, हवाई दलाची चार मुख्यालयेही दक्षिण मुख्यालयाच्या क्षेत्रात आहेत. दक्षिण मुख्यालयाला एकावेळी दोन सीमांवर लक्ष ठेवावे लागते. कोणत्याही प्रकारच्या नैसर्गिक आपत्ती, संकटकाळात मदतीसाठी दक्षिण मुख्यालय सज्ज असते. दक्षिण मुख्यालयाअंतर्गत संरक्षण उत्पादनाशी संबंधित विविध घटकांचे मोठे जाळे येथे आहे.



### पुढच्या वर्षीसाठी शहरांची निवड...

» लष्करदिनाच्या अशा कार्यक्रमासाठी पुढच्या वर्षीसाठी गुवाहाटी, जयपूर, भोपाळ, जबलपूर या शहरांची निवड केली आहे. यासाठी एक समिती नेमली असून ती या शहरांची पाहणी करेल. आवश्यक सुविधा उपलब्ध असलेल्या शहरात हे संचलन होईल. तसेच, पुढील वर्षीच्या संचलनात माजी सैनिकांची तुकडी, खासगी संरक्षण उत्पादकांच्या उत्पादनांचे प्रदर्शन करणारा एक चित्ररथ असेल, असे जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी सांगितले.

त्यामुळे येत्या परिवर्तनाच्या काळात दक्षिण मुख्यालयाची भूमिका महत्त्वाची राहील, असे जनरल द्विवेदी म्हणाले. मानसिक स्वयंपूर्णता, औद्योगिक स्वयंपूर्णता, भारतीय दृष्टीने विकसित भारताचे उद्दिष्ट साध्य करणे या तीन प्रकारे मी स्वयंपूर्णतेकडे पाहतो. बुधवारी पुण्यात झालेल्या संचलनातील सर्व गोष्टी आत्मनिर्भर म्हणजे भारतीय बनावटीच्या होत्या. लष्कर आपला ८५ टक्के भांडवली खर्च देशाअंतर्गत उत्पादनांवर करीत आहे, असेही जनरल द्विवेदी यांनी नमूद केले.

> लष्कराचा आणि पुण्याचा मोठा ऋणानुबंध आहे. या परिसराने भारताला चार लष्करप्रमुख आणि ४८ चक्र विजेते सैनिक, अधिकारी दिले आहेत. शिक्षण, संशोधन आणि विकास, संरक्षण उत्पादन या बाबतीत पुणे हे लष्करासाठी पॉवरहाउस आहे. हा कार्यक्रम यशस्वी केल्याबद्दल मी राज्य सरकार आणि पुणेकरांचा आभारी आहे.
>
> - उपेंद्र द्विवेदी, लष्करप्रमुख जनरल

पश्चिम सीमेच्या (पाकिस्तान) प्रत्यक्ष ताबारेषेवर शस्त्रसंधी कायम असतानाही घुसखोरीचे प्रयत्नही होत आहे, असे जनरल द्विवेदी यांनी सांगितले. जम्मू काश्मीरच्या अंतर्गत भागात संरक्षण दलांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नातून हिंसाचाराच्या घटनांमध्ये लक्षणीय घट झाली आहे. मागच्या वर्षात लोकसभेची निवडणूक, विधानसभेची निवडणूक आणि अमरनाथ यात्रा शांततेत पार पडली. हे तेथील सुरक्षाव्यवस्थेत सुधारणा झाल्याचेच निदर्शक आहे, असे जनरल द्विवेदी यांनी नमूद केले.

आपला देश विकसित भारत हे लक्ष्य साध्य करण्याच्या दिशेने पावले टाकत आहे. देशाला प्रगती आणि विकासाच्या मार्गावर अग्रेसर ठेवण्यासाठी स्थिर आणि सुरक्षित वातावरणाची गरज असून ते पुरवण्यात भारतीय लष्कराची भूमिका महत्त्वाची राहील. देशाची अंतर्गत सुरक्षा भक्कम राखण्यातही लष्कराचा सहभाग आहे. लष्कराच्या प्रयत्नांमुळे विविध भागातील परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यात यश येत आहे. कठीण आणि संवेदनशील परिस्थितीत आपल्या जवानांनी संयम आणि परिपक्वता दर्शवत मोलाची भूमिका बजावली आहे, असे जनरल द्विवेदी यांनी सांगितले.

# 2025 पासून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने स्पर्धांसाठी 1 कोटींचा निधी

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांची मोठी घोषणा; 23 व्या छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेचे उद्घाटन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आले

**पुणे | प्रतिनिधी**

बारामती येथील रेल्वे मैदानावर २३ व्या छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेचे उद्घाटन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाच्या भाषणावेळी अजित पवार यांनी मोठी घोषणा केली आहे. पुढील वर्षांपासून राज्य सरकारच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने चार स्पर्धांच्या आयोजनासाठी प्रत्येकी १ कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यात येईल, अशी महत्वपूर्ण घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या स्पर्धेच्या व्यासपीठावरून केली.

या कार्यक्रमाला कृषीमंत्री माणिकराव कोकाटे, पशुसंवर्धनमंत्री पंकजा मुंडे, खासदार सुप्रिया सुळे, खासदार सुनेत्रा पवार, प्रशांत काटे, प्रशांत सातव, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील आदी उपस्थिती होते.



राज्यात आपण छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने कबड्डी, खोखो, व्हॉलीबॉल, कुस्ती या स्पर्धांचे दरवर्षी आयोजन करतो. सुरुवातीला या स्पर्धेच्या आयोजनासाठी राज्य सरकारच्या वतीने २५ लाख रुपयांचा निधी दिला जात असे. त्यानंतर तो निधी ७५ लाखांपर्यंत वाढविण्यात आला, असल्याची माहिती अजित पवार यांनी यावेळी दिली.

### विनंती करुन स्पर्धेसाठी बारामतीमध्ये पोहचलो

» मुंबईत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा दौरा आहे. या दौऱ्यात आमदारांसोबत संवाद साधणार असल्याचे सांगण्यात आले आहे. त्यामुळे पंतप्रधानांना विनंती करून बारामतीमध्ये पोहचलो असल्याचे स्पष्टीकरण अजित पवार यांनी दिले. तसेच पंतप्रधान यांच्या स्वागतासाठी प्रोटोकॉलप्रमाणे देवेंद्र फडणवीस यांना तिथे थांबवे लागले आहे. यामुळे या स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभासाठी उपस्थित राहू शकणार नाही, असे अजित पवार यांनी सांगितले.

तसेच आता राज्याचा अर्थमंत्री या नात्याने या चार स्पर्धांच्या आयोजनासाठी पुढील वर्षांपासून १ कोटी रुपयांचा निधी देणार असल्याचे जाहीर करतो. खेळ चांगला झाला पाहिजे, खेळाडूंना सर्व सुविधा मिळाल्या पाहिजेत, हा यामागे हेतू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या कार्यक्रमाला क्रिडामंत्री दत्तात्रय भरणे उपस्थित होते. या कबड्डी स्पर्धेत राज्य सरकारच्या वतीने २० लाखांची बक्षीसे आहेत. तर यामध्ये बारामतीकरांच्या वतीने २५ लाखांची भर घालण्यात आली आहे, असे देखील पवार यांनी सांगितले.